नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०५/२०२६ (गुरूवार )

---

## पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये दाखल गुन्हयातील अवैध रेती तस्कर टोळीतील पाहीजे आरोपीला अटक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :– नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर येथे **बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करून शासनाचा महसुल बडवुन फसवणुक करणारा** टोळी प्रमुख तसेच ८ टोळी सदस्य अशा एकुण ९ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे **टोळी प्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर वटोळी सदस्य आणि ८ सदस्य यांच्यावर** कलम ३०३ (२), ३१८(४),३३६(३),४९,३(५) भा न्या सं सहकलम ४८ (७) ४८ (८) महा. जमीन महसुल संहित १९६६ सह ४, २१ खान व खनीज अधीनियम १९५७ सह कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रती अधिनियम ,सह १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सह कलम ३ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये गुन्हा नोंद आहे. **सदर गुन्हयात पोलीसांनी टोळी प्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन, वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर वटोळी सदस्य २) कैसर अली रियाजुददीन अली,वय ४७ वर्ष,रा. गरीब नवाज चौक, खरबी, नागपूर ३) सुरज दिलीप गभने, वय २७ वर्षे, रा.गुडेगाव, पो.सावरला, ता. पवनी जि.भंडारा, ४) दिनेश मधूकर काकडे, रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपूर यांना यापुर्वी अटक केलेले आहे.**

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्या च्या माहीतवरून सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे शैलेंद्र उर्फ जितु कवडु वैद्य, वय ३५ वर्षे, रा. पाचगाव वार्ड क्रमांक २, वोडाफोन टॉवरच्या बाजूला तालुका उमरेड जि. नागपूर याला मौजा तरोडी ,जबलपुर बायपास येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे.



आरोपी शैलेंद्र उर्फ जितु कवडु वैद्य,

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ०३ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०६/०५/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा कवठा पांदन रोडवर नाकाबंदी केली असता महींद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच ४० बी ई २१७२ विना क्रमांकाच्या ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक गौतम सुधाकर गौरखेडे, रा. खापा पाद्रीवार, ता. सौसर, जि. पांढुर्णा मध्यप्रदेश हा मिळुन आला.** आरोपींस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक ट्रॅक्टर क्र. एम एच ४० बी ई २१७२ किंमती ३,००,०००/— रूपये विना क्रमकांची ट्रॉली किंमती ८०,०००/—रूपये आणि १ ब्रास रेती किंमती १०,०००/— रूपये असा एकुण किमती ३,९०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.
# ७ दुचाकी वाहनासह ०३ लाख ४१ हजार १० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन केळवद** :—दिनांक ०६/०५/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मंगसा ते रामपुरी रोडवर शेतशिवाराच्या रस्त्याने काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मळालेल्या माहीतीच्या आधारे केळवद पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली असता काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) कामराज यादवराव रहाटे, वय ४८ वर्षे, २) अमीत गोपालराव महाजन, वय ४० वर्ष, ३) विनायक भिमरावजी गजभिये, वय ३५ वर्षे, ४). प्रवीण तिलकजी बंदे, वय ४२ वर्ष, ५). रोशन अजाबराव भुरके, वय ४२ वर्ष, ६). अशोक**

गुलाबराव रहाटे, वय ४१ वर्ष, ७). भिमराव देवरावजी सहारे, वय ५० वर्ष, सर्व रा. मंगसा, ता. सावनेर यांना जागीच पकडले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते व रोख रक्कम १०१०/— रूपये, ०२ अॅडरॉइड मोबाईल किंमती ४०,०००/—रूपये, ०६ मोटरसायकल किंमती ३,००,०००/— रूपये असा एकुण ३,४१,०१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा**:— दिनांक ०६/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपूर रोड उडान पुलासमोंर मारोडी शिवार येथे अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भंडारा ते नागपूर रोड उडान पुलासमोंर मारोडी शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक टाटा इंट्रा पिकअप क्र.एमएच ३५एजे ३४६० मिळुन आला. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली **असता क्रं १) चालक नामे आसिफ हनिफ खान, वय ४५ वर्ष, रा. परवेश पटेल हाऊस, महाल वार्ड भंडारा क्रं २) वाहक नामे उवेष मोहम्मद रफिक शेख, वय १८ वर्ष, रा. बाजारपेठ जामा मज्जीद जवळ, अडयाळ जि. भंडारा** हे मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ जनावरे (२ म्हशी, २ रेडे) असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयीपणे वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा इंट्रा पिकअप क्र. एम एच ३५ एजे ३४६० किंमती ५,००,०००/—रूपये आणि ०४ जनावरे किंमती १,१०,०००/—रूपये असा एकुण ६,१०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध कलम ११(१) (अ) (ई) (ह),(फ) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि. १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# काटोल पोलिसांच्या तत्परतेमुळे ६ लाखांचा सोन्याचा हार महिलेला मिळाला परत

**पोलीस स्टेशन काटोल**:— दिनांक ०६/०५/२०२६ रोजी श्रीमती जिजाबाई भगवंतराव सातपुते, वय ६५ वर्ष, रा. वडविहीरा, ता. काटोल या लग्नकार्याकरिता काटोल येथे आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी अंदाजे ४ तोळे वजनाचा, सुमारे ०६ लाख रुपये किंमतीचा सोन्याचा हार परिधान केलेला होता. लग्नकार्य आटोपल्यानंतर त्यांनी सदर हार गळ्यातून काढून छोट्या पर्समध्ये ठेवला व ती पर्स त्यांच्या पिशवीमध्ये ठेवून काटोल शहरात काही खरेदी केली. त्यानंतर त्या एस.टी. बसने त्यांच्या गावी वडविहीरा येथे परत गेल्या. घरी पोहोचल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, सोन्याचा हार असलेली पर्स पिशवीमध्ये नाही.

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी दागिना ठेवलेली पर्स गहाळ झाल्याबाबत श्रीमती जिजाबाई यांनी पोलीस स्टेशन काटोल येथे माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक श्री. रणजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांनी तात्काळ गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा पोलीस निरीक्षक विवेक राऊत, पोहवा कैलास उईके, पो अं राणा संतापे, पो अं हेमराज कोल्हे व मापोहवा मोरे यांना सदर प्रकरणी हाराचा शोध घेण्याबाबत आदेशित केले.तपास पथकाने तात्काळ बसस्थानक तसेच संबंधित महिला ज्या—ज्या ठिकाणी गेल्या होत्या त्या परिसरात चौकशी सुरू केली. चौकशीदरम्यान तार बाजार, काटोल येथील प्रकाश मेटल दुकानातील कर्मचारी अल्केश बाळकृष्ण आंबेडकर, रा. काटोल यांनी दिनांक ०६/०५/२०२६ रोजी दुकानाबाहेर हार असलेली पर्स मिळाल्याची माहिती दिली. त्यांनी तो दुकानात बाजूला ठेवून दिला होता. पोलिसांच्या चौकशीदरम्यान सदर हार हा जिजाबाई सातपुते यांचाच असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी प्रामाणिकपणाने तो पोलिसांकडे सुपूर्द केला.

यावेळी दुकान मालक अमित प्रकाशराव हाटेकर व कर्मचारी अल्केश आंबेडकर यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच काटोल पोलीसांनी तात्काळ दखल घेऊन महिलेचा गहाळ झालेला मौल्यवान सोन्याचा हार शोधून दिल्याबद्दल तक्रारदार श्रीमती जिजाबाई सातपुते यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले.




# नागपूर ग्रामीण जिल्हयातअंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

दिनांक ०६/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**कन्हान पोलीस स्टेशन** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी आकाश दिगांबर वानखेडे, वय २७ वर्ष, रा. खंडाळा ता. पारशिवनी जि. नागपूर हा डब्लूसीएल खदान नं ०३, पारशिवणीयेथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच ओपन कास्ट खदान नं ०३ पारशिवणी येथे आरोपी नामे २) दिनेश श्रीकृष्ण चव्हान, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. ५, कांद्री कन्हान सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.३) अरुन रघुपत सिंग, वय ४७ वर्ष, रा. सब एरिया ऑफिस समोर खंदान नं ०३, ता. पारशिवणी हा खंदान नं. ३चे

बाजूला पारशिवनी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.तसेच **बेला पोलीस स्टेशन** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी राहूल धर्मराज मसराम, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं ०३, सिर्सी ता. उमरेड, जि नागपूर हा मौजा सिर्सी बाजार समिती परीसरयेथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

वर नमुद ०४ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक ०६/०५/२०२६रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू व साहित्य असा एकुण ३९,४३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) पुरूषोत्तम बापुराव धार्मीक, वय ६० वर्ष, रा.खापा, ता.सावनेर, जि.नागपूर २) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे दिवाकर जंगलुजी काकाडे, वय ४० वर्ष, रा वार्ड क्र १४, माताखेडी सावनेरयाचे वर १ गुन्हा नोंद,**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) नामे अनिल प्रकाश शर्मा, वय ४२ वर्ष, रा. बोरखेडी फाटक, ता जि नागपूर २) अश्विन देविदास सलाम वय ३१ वर्ष,याचेवरप्रत्येकी १ असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी क्र. १) नामे राहुल बापुराव वेताळकर, वय ३५ वर्ष, रा. वडारपुरा कोंढाळी २) विनोद गोवर्धन ढेंगरे, वय ४२ वर्ष, रा. पंचधार याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) दिलीप सुदंर चव्हाण, वय ३२ वर्षे, रा.नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद,२) धिरज हरिभाऊ गजभिये, वय २६ वर्ष, २) महिला आरोपी दोन्ही रा. खरसोली तह. नरखेड जिल्हा नागपूर यांचेवर १ गुन्हा नोंद,**पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १)

दुर्गेश राजकुमार सिंगाडे, रा. उमरी, ता. रामटेक, जि नागपुर २)कन्हेया नत्थु मडावी, वय ६३ वर्ष, रा कांद्री ३)रांझा श्याम कठौते, वय ३५ वर्ष, रा. कांद्री रामटेक ४)लोकेश महेश कारकर, रा. आझादवार्ड रामटेक याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे नागेश्वर सुखदेव सोनवाने, वय ३८ वर्ष, रा. चिरव्हा याचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ४८ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ८७३० मिली देशी दारू व साहित्य असा एकुण ३९,४३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने